सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
दूरध्वनी क्र. /Tel. No. 2262 1220

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.

ई-मेल:- cp.mum.dcp.det@mahapolice.gov.in

जा.क्र./OW.No. 306/पोउआ/प्रकटीकरण /2023 दिनांक/Date : 06/03/2023

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

विषय :– Best Detection of the Month December – 2022 ‘‘उत्कृष्ट गुन्हे शोध’’ व
Best Conviction of the Month December – 2022 ‘‘उत्कृष्ट अपराधसिध्दी’’
पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे डिसेंबर –२०२२ करीता ‘‘ **बेस्ट डिटेक्शन अर्थात ( उत्कृष्ट गुन्हे शोध ) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात ( उत्कृष्ट अपराधसिध्दी)** ’’ याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे याची निवड करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

अ) माहे डिसेंबर – २०२२ करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ –

**१) गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष–०९, गुन्हे शाखा, मुंबई, गुरक्र ३०८/२०२२ कलम ३०२, ३२८, १२० (ब) भा.द.वि. (सांताक्रुझ पोलीस ठाणे, गु.र.क्र. १२११/२०२२)**

**२) कांजुरमार्ग पोलीस ठाणे, परिमंडळ–०७, मुंबई गु.र.क्र. १२७/२०२२ ३६३, ३६३(अ),३७०,३४ भादंवि सह कलम ७५, ७६, ८१ बालक संरक्षण अधिनियम,)**

ब) माहे डिसेंबर – २०२२ करीताचे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ –

**अंमली पदार्थ विरोधी कक्ष, आझाद मैदान युनिट गु.अ.वि, गु.शा, मुंबई गु.र.क्र. ४५/२०१७, कलम८ (क) सह २२ (क) एन्.डी.पी.एस्.ॲक्ट,१९८५**

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

सही/–
पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

प्रत:–

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

मजकुर :—

दिनांक ०१/०३/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **Best Detection of the Month** '' माहे डिसेंबर —२०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ डिसेंबर —२०२२

| | | |
|---|---|---|
| ०१ | कक्ष—०९, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई | गु.प्र.शा.,गु.र.क्र. ३०८/२२ कलम ३०२, ३२८, १२० (ब) भा.द.वि. (सांताक्रुझ पोलीस ठाणे, गु.र.क्र. १२११/२२) |

—: " कट रचून खुन '':—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमूद गुन्हयात गुन्हे शाखा, कक्ष ०९, बांद्रा प., मुंबई यांनी केलेल्या सखोल चौकशीमध्ये तसेच महीला नामे कविता कमलकांत शहा व हितेश शांतीलाल जैन यांचे मोबाईलचे फॉरेन्सिक तज्ज्ञाकडून एक्सट्रॅक्शन करून मिळालेल्या पुराव्यावरून महीला कविता कमलकांत शहा व हितेश शांतीलाल जैन या दोघांनी मिळून फौजदारीपात्र कट करून मयत इसम कमलकांत शहा याची संपत्ती मिळावी तसेच कविता शहा हीस आरोपी नामे हितेश शांतीलाल जैन याच्या सोबत असलेल्या अनैतिक संबधामधील अडसर दूर करण्याचे उद्देशाने मयत इसम कमलकांत कपूरचंद शहा, वय ४६ वर्षे यास आर्सेनिक व थेलीयम हे विषारी धातू खाण्या—पिण्यातून देऊन मृत्यु घडवून आणला असे निष्पन्न झाल्याने मयत याची बहीण तथा फिर्यादी यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| र्यादी | :— | सौ. कविता अरूणकुमार ललवाणी, वय ४२ वर्षे, |
| ळीत | :— | कमलकांत कपूरचंद शहा, वय: ४६ वर्षे, |
| ारोपी अटक व नांक | :— | १) कविता उर्फ काजल कमलकांत शहा, वय ४५ वर्षे,<br>२) हितेश शांतीलाल जैन, वय ४५ वर्षे,<br>अटक दिनांक — ०१/१२/२०२२ |

तपास कौशल्य :— नमूद गुन्हयांत संताक्रुझ पोलीस ठाणे अपमृत्यु क्र. ६५/२२ कलम १७४ फौ. दं.प्र.संहिता या अपमृत्यु हे प्रकरण बऱ्याच दिवसांपासून पोलीस ठाणे पातळीवर प्रलंबीत असताना, त्या प्रकरणाची चौकशी कक्ष ९, गुन्हे शाखा, गु.अ.वि. बांद्रा, मुंबई यांनी करणेबाबत मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), बृहन्मुंबई यांनी आदेशित केले होते. त्याप्रमाणे नमुद अपमृत्यु प्रकरणाची चौकशी व तपास पो.नि. दिपक पवार यांनी केला.

नमुद अपमृत्यु प्रकरणामधील मयत इसम कमलकांत कपूरचंद शहा, वय: ४६ वर्षे, हे दि.०३/०९/२०२२ ते दि. १९/०९/२०२२ या कालावधीत बॉम्बे हॉस्पीटल, मुंबई येथे उपचार घेत होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झाल्याने डॉक्टरांनी आझाद मैदान पोलीस ठाणेस मेडीको लिगल केस म्हणून कळविले. त्यावरून आझाद मैदान पोलीस ठाणे यांनी ००/२२ अन्वये दि. २०/०९/२०२२ रोजी अपमृत्यु नोंद केला व पुढील कार्यवाहीसाठी सांताक्रुझ पोलीस ठाणे येथे पाठविला होता.

यातील मयत हा प्रतिष्ठीत व्यावासायिक होते. त्याच्या स्वत:च्या दोन कापड निर्मितीचे कारखाने आहेत. अश्या करोडपती व्यावसायिकाचा मृत्यु हा संशयास्पद होता. त्याच्या मृत्यु प्रकरणात कुठलीही दिशा नसताना पो.नि. दिपक पवार यांनी स्वत:चे कौशल्य वापरून साक्षीदारांचे जबाब व संबधीत व्यक्ती यांच्याकडे अत्यंत चणाक्ष बुद्धीने चौकशी करून त्यांचे जबाब नोंदविले. त्यातून त्यांनी खरे गुन्हेगार कोण असावेत या निष्कर्षाप्रत आले. त्यांच्या अपमृत्यु चौकशीत असे निदर्शनास येत होते की, मयताची पत्नी सौ.कविता कमलकांत शहा व मयताचा लहानपणीचा मित्र हितेश शांतीलाल जैन, या दोघांनीच नियोजनबद्ध कट रचून मयताचा खून केला असावा. परंतु त्यांच्या विरूद्ध कोणताही ठोस पुरावा मिळत नव्हता.

त्यामुळे या प्रकरणातील संशयीत आरोपीतांकडे चौकशी दरम्यान त्या दोघांचे वापरत्या मोबाईल्सचा डाटा फॉरेन्सिक टुल्सच्या मदतीने एक्सट्रॅक्ट केला. सदरहु एक्सट्रॅक्ट केलेला डाटामध्ये जवळपास ६,००,००० (सहा लाख) फोटो, ४,५०,००० (साडे चार लाख) व्हॉट्सअॅप चॅटचे मेसेजेस, १४,००० (चौदा हजार ) साधे मेसेजेस, ३४०० (चौतिसशे) ऑडिओ, ३१०० (एकतीसशे) विडीओ, ३००० (तीन हजार) ईमेल, व इतर सोशल मिडीयाचे मसेजेस असा जवळपास ११,००,००० ( अकरा लाख) एवढे प्रचंड प्रमाणात कंटेट मिळून आले होते. सदरचा

डाटा हा अत्यंत क्लिष्ट स्वरूपाचा असूनही सतत दोन महिने अतिप्रचंड मेहनतव चिकाटीने त्याचे विश्ले ाण करून दोन्ही आरोपीतांविरूद्ध ठोस पुरावे गोळा केले.

आरोपीतांनी अत्यंत चणाक्ष व हुशार बुद्धीने सदरच्या विषारी धातूंची माहिती त्यांनी इंटरनेट व अन्य माध्यमातून घेतली. सदरहू विषारी धातूंस कोणतीही चव व गंध व वास नसल्याने ते विष खाण्यापिण्यातून दिल्यास कोणासही समजून येत नाही. तसेच वैद्यकीय उपचारादरम्यान सहजासहजी समजूनही येत नाही. विषारी दुनियेत या विषास 'मॅजिकल पॉइझन' असे म्हणतात. असे विष मयत इसमांना खाण्यापिण्यातून दिले, तर कुणासहीसंशय येणार नाही. असे पडयंत्र दोन्ही आरोपीतांनी आखून श्री. कमलकांत शहा व त्याची आई श्रीमती सरलादेवी शहा यांचा खून केला व त्यानंतर दोन्ही आरोपी बिनदिक्कतपणे समाजात सहजपणे वावरत होते.

सदरहू प्रकरणातचा तपास करीत असताना यातील मयत इसमाची आई श्रीमती. सरलादेवी कपूरचंद शहा, हिचा सुद्धा आरोपीतांनी 'आर्सेनिक' व 'थेलीयम' हे विषारी धातू खाण्यापिण्यातून देऊन तीचा ही खून केला असल्याचे निष्पन्न केले. तरी मयताची पत्नी कविता कमलकांत शहा व मयताचा लहानपणीचा मित्र हितेश शांतीलाल जैन या दोघांमध्ये अनैतिक संबध होते, तसेच त्यांना मयताची संपत्ती हडप करून एकमेकांशी लग्न करावयाचे होते, या उद्देशाने त्यांनी कट रचून श्री. कमलकांत शहा व त्याची आई सरलादेवी या दोघांचाही 'आर्सेनिक' व 'थेलीयम' हे विषारी धातू खाण्यापिण्यातून देऊन खून केला असल्याचे निष्पन्न करून त्यांचेविरूद्ध सांताक्रुझ पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१२११/२२ कलम ३०२, ३२८, १२० (ब) भादवि अन्वये नोंद केला.

त्यानंतर तो गुन्हा पुन्हा तपासास घेऊन गुन्हे शाखेचा स्वतंत्र गुन्हा (गु.र.क्र. ३०८/२२) नोंद केला. गुन्हयातील दोन्ही आरोपीतांना अटक करून त्यांनी गुन्हा करताना वापरलेला आर्सेनिक हा विषारी धातू हस्तगत केला. तसेच आर्सेनिक व थेलीयम हे धातू कोठून प्राप्त केले याचाही अथक परिश्रम घेऊन शोध लावला. तसेच आरोपीतांचे सी.डी.आर.व इतर तांत्रिक डाटा यांचे तौलनिक विश्लेषण करून आरोपीतांनी सदरचे विषारी धातू प्राप्त करण्याकरीता ज्या ऑनलाईन पद्धतीचा वापर केली होता, ते शोधून काढण्यात यश प्राप्त केले.

तरी अशाप्रकारचा अत्यंत क्लिष्ठ व कठीण स्वरूपाच्या प्रकरणात अत्यंत मेहनत, सातत्य, चिकाटी व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तांत्रिक विश्लेषण याची उत्तम सांगड घालून गुन्हा उघडकीस आणला आहे.

गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष—०९, गुन्हे शाखा, तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक | संजय खताळे. | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | किरण आहेर | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | सिध्दाराम म्हेत्रे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस निरीक्षक | दिपक पवार | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | उत्कर्ष वझे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | महेंद्र पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | म.पोलीस उप निरीक्षक | स्नेहल पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.शि.क्र. ०९—१७६५ | प्रशांत भुमकर | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | म.पो.शि.क्र. ०९—१२३४ | साधना सावंत | प्रशस्तीपत्रक |

२) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ डिसेंबर –२०२२

| | | |
|---|---|---|
| ०५ | कांजुरमार्ग पोलीस ठाणे, परिमंडळ–०७, मुंबई | गु.र.क्र. १२७/२०२२ ३६३, ३६३(अ),३७०,३४ भादंवि सह कलम ७५, ७६, ८१ बालक संरक्षण अधिनियम, |

–: '' अपहृत मुलांना भिक मागण्याकरीता अपहरण करणे '':–

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :–** नमूद गुन्हयात फिर्यादी सौ.वर्षा नंदु कांबळे, वय ३० वर्षे या माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर नवऱ्याबरोबर भांडण झाल्याने त्यांच्या दोन लहान मुलांसह पुणे येथून ट्रेनमधून मुंबईकडे येत असताना त्यांची ओळख एका अनोळखी जोडप्यासोबत झाली होती व सदर जोडप्यासावेत त्या कांजुरमार्ग रेल्वे स्टेशन ब्रिजवर राहत होत्या. दिनांक ०४/१२/२०२२ रोजी सकाळी ०९:०० वा. सुमारास फिर्यादी दोन्ही मुलांना अनोळखी दाम्पत्याच्या ताब्यात देवून इडली घेण्यासाठी गेल्या असताना सदर अनोळखी जोडप्याने त्यांची दोन्ही लहान मुले पळवून नेल्याने गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | सौ.वर्षा नंदु कांबळे, वय ३० वर्षे |
| अपहरण झालेली मुले | :– | १) योगेश नंदु कांबळे,वय ५ वर्षे<br>२) मोनाली नंदु कांबळे,वय १ वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | :– | १) हर्षल उर्फ हऱ्या हाबऱ्या काळे, ३५ वर्षे<br>२) ताराबाई उर्फ लिंबडी टायफन काळे, ४८ वर्षे<br>३) चंदू निवरती उर्फ निवृत्ती काळे, ६५ वर्षे<br>अटक दिनांक १४/१२/२०२२ रोजी |

**तपास कौशल्य :–** नमूद गुन्हयात अपहरण करण्यात आलेल्या ०१ वर्षाची मुलगी व ०४ वर्षाचा मुलगा असे दोन्ही मुलांचे छायाचित्र देखील नसल्याने, फिर्यादी यांच्या अपहृत मुलांचा शोध घेवून, सदरचा अशक्यप्राय गुन्हा उघडकीस आणणे हे एक मोठे आव्हान होते. सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असल्याने, वरिष्ठांनी तपासी पथके तयार करून गुन्हा उघडकीस आणण्याची जबाबदारी सोपविली होती.

गुन्हयाचे प्राथमिक तपासा दरम्यान, आरोपीतांकडे मोबाईल फोन असल्याचे व ते क्वचितच सदर मोबाईल फोनचा वापर करत असलेबाबत कळले होते. तसेच फिर्यादी यांनी सुरूवातीस मुलुंड रेल्वे स्थानका बाहेर वास्तव्य केले असल्याने मुलुंड (प.) रेल्वे स्थानका बाहेरचे परिसरात तपास केला. सदर तपासा दरम्यान फुटपाथवरील उपस्थित भिक्षेकरी यांचेकडे नमूद गुन्हयातील आरोपीतांबाबत चौकशी केली. सदरवेळी भिक्षेकरी हे पारधी समाजाचे असलेबाबत समजल्याने, सदर ठिकाणाचा व कांजुरमार्ग येथील डम्प डाटा, टॉवर आय.डी. क्रमांक प्राप्त केले. तसेच कांजुरमार्ग रेल्वे स्थानक येथील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले. त्यात आरोपीतांनी दि. ०४/१२/२०२२ रोजी कांजुरमार्ग रेल्वे स्थानक येथील फलाट क्र. १ वरून कल्याण येथे जाणारी ०८.४८ वा.ची लोकल ट्रेन पकडलेली असल्याचे दिसून आले.

तपासी पथकाने दि. ०५/१२/२०२२ रोजी कल्याण रेल्वे स्थानक येथे एकत्रितपणे येवून, आरोपीत व्यक्ती हे भिक्षेकरी असल्याने, त्यांचा व अपहृत दोन्ही लहान मुलांचा रेल्वे स्थानक परिसर, बाजारपेठ परिसर व इतर महत्त्वाचे गर्दीचे ठिकाणी शोध सुरू केला. दरम्यान पो. उप निरी. साटम यांना आरोपीत व्यक्ती हे अपहृत मुलांसह दि. ०४/१२/२०२२ रोजी ०९.४६ वा. कोयना एक्सप्रेसमधून पुणेचे दिशेने निघून गेलेले असलेबाबतचे सीसीटीव्ही फुटेज प्राप्त झाले. प्राप्त सीसीटीव्ही फुटेजमध्ये ४ संशयितांपैकी दोन महिला व दोन पुरूष हे त्यांचे ४ बालकांसह २ अपहृत बालकांना घेवून जात असल्याचे दिसून आले. त्यामुळे कल्याण रेल्वे स्थानक ते पुणे रेल्वे स्थानका दरम्यान ज्या ज्या स्थानकांवर कोयना एक्सप्रेस ट्रेन थांबते त्या स्थानकांवरील सीसीटीव्ही फुटेजेस तपासण्यात आले असता त्यांची माहिति मिळून आली नाही.

आरोपीत व्यक्ती हे कोयना एक्स्प्रेस ट्रेनमधून कोल्हापूरचे दिशेने गेलेले असलेबाबत निश्चित करून कोल्हापूर रेल्वे स्थानक येथे दि. ०६/१२/२०२२ रोजीचे सीसीटीव्ही फुटेजेसची पाहणी करण्यात आली. त्यात हि काही मिळून आले नाही. परंतू कोल्हापूर रेल्वे स्थानक येथे येणाऱ्या इतर ट्रेनचे आगमनाचे वेळेमधील दोन दिवसांचे सीसी फुटेजेस् तपासले असता, आरोपीत हे अपहृत मुलांसह दि. ०५/१२/२२ रोजी महाराष्ट्र एक्सप्रेसमधून १२.२० वा. कोल्हापूर रेल्वे स्थानक येथे उतरलेले असल्याचे आढळून आले. त्यानंतर कोल्हापूर रेल्वे स्थानक, रंकाळा, महालक्ष्मी मंदिर

परिसरात शोध घेत असताना सदर आरोपीत व्यक्ती हे अपहृत मुलांसह दि. ०५/१२/२२ रोजी १८.४० वा. चे कोल्हापूर रेल्वे स्थानक येथून सांगली येथे जाणाऱ्या लोकल ट्रेनमधून सांगलीचे दिशेने निघून गेले असलेबाबतचे सीसीटीव्ही फुटेज प्राप्त झाले.

दरम्यानचे काळामध्ये, आरोपीत व्यक्ती हे पारधी समाजाचे असलेबाबत शक्यता असल्याने, नमुद सीसीटीव्ही फुटेजेस् सांगली,कोल्हापूर, पुणे, अहमदनगर जिल्हा पोलीस येथील ओळखीचे पोलीस अंमलदार यांना पाठविण्यात आले. परंतु, प्राप्त सीसीटीव्ही फुटेजेस् हे अस्पष्ट असल्याने, आरोपीतांची खात्रीशिर ओळख पटविणेबाबत अडचण येत होती. त्याचवेळी अहमदनगर जिल्हा पोलीस दलातील श्रीगोंदा पो. ठा. येथे नेमणुकीस असलेले स.फौ. ढवळे यांचेकडून अभिलेखावरील आरोपींचे प्राप्त झालेल्या फोटोंवरून, अभिलेखावरील आरोपी हर्षल उर्फ हऱ्या हाबऱ्या काळे या आरोपीताचा फोटो व सीसीटीव्ही फुटेजमधील भगव्या रंगाचा सदरा परिधान केलेला आरोपीत व्यक्तीचे देह यष्टीसोबत साधरणत: मिळता जुळता असलेबाबत माहिती प्राप्त झाली.

सदर माहितीवरून स.फौ. ढवळे यांचेकडून सदर संशयित आरोपी वापर करत असलेला मो.क्र. ८४५९४७५७०२ प्राप्त केला. सदरप्रमाणे प्राप्त मो.क्र. व फिर्यादी यांचा मो.क्र. ९९६७४७३०३५ यांचे सी.डी.आर. तपासकामी प्राप्त केले व सदर प्राप्त सी.डी.आर. चे विश्लेषण केले असता सदर दोन्ही मो.क्र. चे दि. २८/११/२०२२ रोजीचे लोकेशन्स् हे एम.जी. रोडी, मुलुंड (प.) येथील एकाच ठिकाणचे असल्याचे निष्पन्न झाले. तसेच संशयित आरोपी वापरत असलेला मो. क्र. चे दि. ०५/१२/२०२२ रोजीचे लोकेशन्स् हे शाहुपुरी, कोल्हापूर व हातकणंगले येथील असल्याबाबतची माहिती प्राप्त झाली. त्यामुळे आरोपीत व्यक्तीं ही हर्षल उर्फ हऱ्या हाबऱ्या काळे असल्याची खात्री झाली.

सदरची माहिती वरिष्ठांना दिली असता त्यांनी नृहसिंहवाडी येथे दत्त जयंतीनिमित्त यात्रा असल्याने सदर ठिकाणी शोध घेणेबाबत मार्गदर्शन केले. त्यानुसार दि. ०७/१२/२०२२ रोजी पथकाने नृहसिंहवाडी येथे दत्त मंदिर परिसर व नदी घाटयेथे शोध घेतला. आरोपी त्याचा मो.क्र. बंद ठेवत असल्यामुळे त्याचा शोध घेणे अवघड जात होते. आरोपीचे लोकेशन दि. ०७/१२/२२ रोजीचे देऊळगांव सिध्दी, अहमदनगर येथील त्याचे राहते गावाकडील असलेबाबत व त्यानंतर सदर आरोपीताने त्याचा मोबाईल संच पुन्हा बंद केलेला असल्याने अहमदनगर येथे जावून आरोपींचा शोध घेणेबाबत पथकातील इतर अधिकारी व अंमलदार यांना कळविण्यात आले.

अहमदनगर येथे स्थानिक पोलीसांचे मदतीने आरोपीतांचे प्राप्त झालेले सीसीटीव्ही फुटेज स्थानिक व्यक्ती यांना दाखविण्यात आले असता, दोन आरोपी हे हर्षल उर्फ हऱ्या हाबऱ्या काळे व त्याची पत्नी पुर्णिमा उर्फ पुर्मा हर्षल काळे असलेबाबतची खात्रीशिर माहिती प्राप्त झाली. त्यानुसार तपासी पथकांनी आरोपीतांचा व अपहृत लहान बालकांचा अहमदनगर शहर, देऊळगांव सिध्दी, हिवरे झरे, वाळकी, भिंगार कॅम्प अहमदनगर, इतर ठिकाणी कसून शोध घेतला. परंतु नमूद आरोपी हे त्यांचे वास्तव्याचे ठिकाण वारंवार बदलत असल्याने व त्यांनी त्यांचेजवळील मोबाईल बंद ठेवल्याने शोध घेणेकामी अडचण येत होती.

दरम्यानचे काळामध्ये गुन्हयातील इतर दोन आरोपी (वयस्कर जोडपे) यांचेबाबत लोणी व्यंकनाथ, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथील स्थानिक पारधी समाजातील लोकांकडून माहिती प्राप्त केली असता, १) ताराबाई उर्फ लिंबडी काळे, २) चंदू काळे असलेबाबत ओळख प्राप्त झाली. तसेच ते लिंबे जळगांव, जि. औरंगाबाद येथील राहणारे असलेबाबतची जुजबी माहिती गुप्त बातमीदारांकडून प्राप्त झाली. तपासी पथकांनी नमुद ठिकाणी शोध घेवून त्यांना दि. १४/१२/२२ रोजी पहाटे दोन्ही अपहृत लहान बालकांसह ताब्यात घेतले. तसेच मूळ आरोपी हर्षल उर्फ हऱ्यार्या हाबऱ्या काळे याचा मो.क्र. चे प्राप्त सी.डी.आर. चे विश्लेषणावरून, त्याचेसोबत सातत्याने संपर्कात असलेला मो.क्र. ७७९६९४२९३९ चा सी.डी.आर. प्राप्त केला व त्यावरून सदर मो.क्र. चा धारक गोरख मुरक्या भोसले, रा. कोपरगांव, जि. अहमदनगर येथील असून तो आरोपीचा मामा असलेबाबतची माहिती प्राप्त केली.

आरोपी हा त्याचेकडे आश्रयास गेलेला असलेबाबत दाट शक्यता वाटल्याने त्याचा देवळणे, जि. नाशिक येथील निर्जन परिसरात शोध घेतला असता, तो सदर ठिकाणी मिळून आला. ताब्यात घेऊन कसून तपास करण्यात आला असता, त्यांनी अपहृत लहान बालकांचे मार्फतीने भीक मिळविण्याचे उद्देशाने त्यांचे अपहरण केले असल्याचे कबुल केले.

नमूद गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा व उघडकीस आणण्याचे दृष्टीने अतिशय क्लिष्ट स्वरूपाचा असून देखील तपासी पथकांनी कोणताही दुवा नसताना कौशल्यपूर्णपणे तांत्रिक माहिती व मानवी कौश्ल्याने सतत ११ दिवस आरोपीतांचा शोध घेऊन अपहृत दोन बालकांची सुखरूप सुटका करून, त्यांना त्यांचे आई—वडिलांचे ताब्यात दिले.

कांजुरमार्ग पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस निरीक्षक | किशोर साळवी | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | सहा. पोलीस निरीक्षक | जितेश शिंगोटे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहा. पोलीस निरीक्षक | संतोष कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहा. पोलीस निरीक्षक | प्रकाश बोराडे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहा. पोलीस निरीक्षक | मोहन जगदाळे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोलीस उप निरीक्षक | ज्ञानेश्वर खरमाटे | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पोलीस उप निरीक्षक | ंकर पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पोलीस उप निरीक्षक | गणेश सानप | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पोलीस उप निरीक्षक | शितल बाबर | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोलीस उप निरीक्षक | अनिल साटम | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ह.क्र. ३०३३१ | अशोक औटे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ह.क्र. ०१७३७ | सचिन ढोमसे | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ना.क्र. ०६१६७० | आकाश पाटील | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.शि.क्र. ११०४८७ | संदेश गव्हाळे | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.शि.क्र. ११०३५० | राजू मलगुंडे | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.शि.क्र. १४०२६० | कुमार ठेंगील | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.शि.क्र. ११११६९ | सचिन बनसोडे | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.शि.क्र.११६२० | जितेंद्र मोरे | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.शि.क्र. ०८०३५९ | योगेश गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.शि.क्र. ०८०००६ | राहुल नवले | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.शि.क्र. ०९०३५२६ | संजय मोटे | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.शि.क्र. ०७१२७८ | विशाल सोनजे | प्रशस्तीपत्रक |
| २३ | म.पो.शि.क्र. ०९१२१४ | रूपाली हाडवळे | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक ०१/०३/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या ‘‘ **BEST CONVICTION OF THE MONTH "** माहे डिसेंबर—२०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ डिसेंबर — २०२२

| | | |
|---|---|---|
| ०१ | अंमली पदार्थ विरोधी कक्ष, आझाद मैदान युनिट गु.अ.वि, गु.शा, मुंबई | गु.र.क्र. ४५/२०१७, कलम ८ (क) सह २२ (क) एन्.डी.पी.एस्.ॲक्ट,१९८५ एन.डी.पी.एस विशेष खटला क्र २७/२०१८ |

—: ‘‘ अस्तित्व लपवुन अंमली पदार्थाची विक्री करणे. ’’:—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात दिनांक १२/०८/२०१७ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्ष, आझाद मैदान युनिटचे पो.नि. संतोष भालेकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथक हे वाडीबंदर ब्रिजजवळ, डोंगरी, मुंबई गस्त करत असताना सदर ठिकाणी संशायास्पद स्थितीत आफ्रिकन वंशाचा इसम मॅथ्यू ओकाको ओकेफोर, वय ३७ वर्षे, दिसुन आला. गस्तीवरील पोलीस पथकाने त्यास अटकाव करून त्याची दोन पंचासमक्ष झडती घेतली असता त्याच्या ताब्यातुन एकुण ६० ग्रॅम वजनाचा ‘एम.डी’ मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ जप्त मिळून आला म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. किसन भागोजी मुकनाक, वय ४६ वर्षे, |
| हसतगत माल | :— | एकुण ६० ग्रॅम ‘मेफेड्रॉन’ (एमडी) हा अंमली पदार्थ रु १,२०,००० |
| निकाल दिनांक | :— | दि.१६/१२/२०२२ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | मॅथ्यू ओकेफोर, वय ३७ वर्षे, राष्ट्रीयत्व — नायजेरियन, अटक दिनांक १३/०८/२०१७ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | म.न्यायालयाने आरोपीस कलम ८(क), २२(क) एन.डी.पी.एस कायदा १९८५ अन्वये दोषी ठरवुन दहा वर्षाचा सश्रम कारावास व रू. १०००००/— दंडाची शिक्षा सुनावली आहे. दंड न भरल्यांस ६ महिने सश्रम कारावास |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हयात तपासी अधिकारी स.पो.नि नितिन बोधे यांनी सदर गुन्हयांचा अंत्यत कौशल्यपुर्ण तपास करून आरोपी विरूध्द असलेले संपुर्ण शास्त्रोक्त व परिस्थितीजन्य पुरावे गोळा केले. तसेच सर्व पुराव्यांची योग्य पध्द्तीने दोषारोप पत्रामध्ये मांडणी केली तसेच न्यालयीन कामकाज पाहणारे पैरवी अधिकारी व कर्मचारी यांनी आरोपीविरूध्द दाखल केलेल्या दोषारोप पत्रामधील सर्व साक्षिदार व पंच यांना विहीत वेळेत मा. न्यायालयांसमक्ष हजर ठेवले होते.

नमुद गुन्हयातील जप्त मालमत्ता मा. रासायनिकविश्लेषक, यांचेकडील अहवालांसह योग्य रितीने सिलबंद स्थितीत मा. न्यायालयांत सादर केले. सरकारी अभियोक्ता, यांचे मार्गदर्शनान्वये आरोपींस जास्तीत जास्त शिक्षा होण्याकरीता मोलाची कामगिरी केलेली आहे.

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, आझाद मैदान युनिट तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | सहा. पोलीस निरिक्षक | नितिन बोधे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | स.पो.उ.नि.क्र.२६४६६ | निवृत्ती चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पो.ह.क्र ३१७२८ | विजय हणमंत दुदुस्कर | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.ना.क्र ०६०११९ | माणिकराव आघाव | प्रशस्तीपत्रक |

टिप:— वरिष्ठ /प्रभारी पोलीस निरीक्षक, गु.प्र.शा.,गु.अ.वि., कक्ष—०९, कांजुरमार्ग पोलीस ठाणे आणि अंमली पदार्थ विरोधी कक्ष, आझाद मैदान युनिट गु.अ.वि, गु.शा, मुंबई यांना कळविण्यात येते की, Best Detection of the Month December – 2022 व Best Conviction of the December – 2022 या करीता निवड झालेनंतर राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of Month) करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र 'क' प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

# Best Detection of the Month

## 'प्रपत्र ' क '

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत<br>**a)** गेलेला माल<br>**b)** जप्त/हस्तगत केलेला मालं | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>**a)** घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळखं कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |

| | | |
|---|---|---|
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) **FIR** प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब,शवविच्छेदन अहवाल, आळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणा साठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०५ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०६ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| १० | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| ११ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>**A**) साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>**B**)पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>**C**) परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>**D**) तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>**E**) वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>**F**) तपासी अंमलदार यांचे जबाब<br>**G**) पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>**H**) सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १२ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आललो आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे

# INTEGRITY CERTIFICATE

Certified that the integrity of Mr/Mrs ………………………………., Designation-…………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2022 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated/pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2023